दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : १७०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, शुक्रवार, दि.३१ जानेवारी २०२५

**।।सुविचार।।**

**नात्याची सुंदरता एकमेकांचे दोष स्वीकारण्यात आहे कारण,**
एकही दोष नसलेल्या माणसाचा शोध घेत बसलात, तर आयुष्यभर एकटे राहाल.

## उत्तर महाराष्ट्रात गारपीट, पावसाची शक्यता!



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, मुंबई :** अफगाणिस्तान, पश्चिम राजस्थानमध्ये सक्रीय असलेला पश्चिमी विक्षोप (थंड वाऱ्याचा झोत) अरबी समुद्रमार्गे उत्तर महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता असल्यामुळे सोमवारपासून (३ फेब्रुवारी) तीन दिवस उत्तर महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची आणि तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पश्चिमेकडून थंड वाऱ्याचा झोत अरबी समुद्रावरून गुजरात मार्गे उत्तर महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या दिशेने वाटचाल करण्याची शक्यता आहे. दुसरीकडे बंगालच्या उपसागरावरून येणारे बाष्पयुक्त वारे मध्य प्रदेशपर्यंत पोहचत आहे. अरबी समुद्रावरून येणारे थंड वारे सोबत बाष्पही वाहून आणणार आहेत. अरबी समुद्रावरून येणारे थंड वारे आणि बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्याची धुसळण (टक्कर) पश्चिम मध्य प्रदेश आणि नंदूरबार, धुळे, जळगावच्या उत्तर भागात होऊन सोमवार, मंगळवार आणि बुधवार, या तीन दिवसांत (३ ते ५ फेब्रुवारी) तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा आणि तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज आहे.

**आठवडाभर ढगाळ वातावरण**

राज्यात पुढील आठवडा ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. सध्या बंगालच्या उपसागरातून ताशी ३० ते ३५ किलोमीटर वेगाने आर्द्रतायुक्त वारे महाराष्ट्राच्या दिशेने येत आहेत. त्यामुळे राज्याच्या बहुतेक भागात पुढील आठवडाभर ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. हलक्या पावसाची शक्यता केवळ उत्तर महाराष्ट्रात आहे. राज्याच्या उर्वरीत भागात फक्त ढगाळ हवामान राहून किमाल-किमान तापमानात वाढ होण्याचा अंदाज आहे, अशी माहिती निवृत्त हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

**हवामान विभाग सुधारीत अंदाज वर्तवविणार**

पश्चिमी थंड वाऱ्यामुळे पुढील आठवड्यात उत्तर महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलका पाऊस होण्याचा अंदाज आहे. गारपीट विषयक अंदाज अद्याप वर्तविलेला नाही. पुढील दोन दिवसांतील हवामान विषयक स्थितीचा अभ्यास करून सुधारीत अंदाज व्यक्त केला जाईल, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.

## ट्रायथलॉनमध्ये महाराष्ट्राला विजेतेपद
### महिला संघ अजिंक्य, तर पुरुष संघाला उपविजेपद




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, हलद्वानी :** महाराष्ट्राच्या ट्रायथलॉन संघाने अखेरच्या दिवशी ड्यूयोथलॉन प्रकारात एक रौप्य व एक कांस्यपदक जिंकून ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचा षटकार झलकावित सर्वसाधारण विजेपदावर मोहोर उमटवली.

वैयक्तिक ड्यूयोथलॉनमध्ये (२.५ किलो मिटर धावणे, २० किलो मिटर सायकलिंग व पुन्हा २.५ किलो मिटर धावणे) डॉली पाटीलने ५७.५३ मिनिटात शर्यत पूर्ण करून रुपेरी यश मिळविले. या शर्यतीत मानसी मोहितेने ५९.५६ मिनिटात शर्यत पूर्ण करून कांस्य पदकावर मोहोर उमटवली.

ट्रायथलॉनमध्ये महाराष्ट्राने ६ पदके जिंकून सर्वसाधारण विजेतपदाही गवसणी घातली. उद्घाटनापूर्वी दोन सुवर्ण पदके जिंकून महाराष्ट्राच्या ट्रायथलॉन संघाने सारे लक्ष वेधून घेतले होते. स्पर्धेत २ सुवर्ण, २ रौप्य व २ कांस्य अशी एकूण ६ पदके जिंकून स्पर्धेत अजिंक्यपदाचा ठसा उमटविला.

## केमिकलयुक्त पाण्याची प्रशासनाने दखल न घेतल्याने संताप
### नगर - पुणे महामार्गावर मनसेचा रास्ता रोको आंदोलन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील सुपा औद्योगिक वसाहतीच्या परिसरातील अहिल्यानगर पुणे महामार्गावर वाघुंडे सुपा गावच्या हद्दीतील जांभुळ ओढा येथे रसायन वाहतूक टँकर चालकाने केमिकल रसायन खाली केल्याने जांभूळ ओढ्यालगत शेतकऱ्यांच्या विहिरींना व कूपनलिकांना तसेच ओढ्यात केमिकलयुक्त पाणी एकत्र झाल्याने ओढ्यालगतचे गवत, झाडे झुडपे जळाली होती. तर ओढ्यातील मासे व साप मृत्यू पाऊन वर आले होते. विहिरींचे पाणी रसायनयुक्त झाल्याने शेतकऱ्यांना ते पाणी शेतीसाठी तसेच जनावरांना पाणी देता येत नव्हते. याबाबत मनसे नेते रविश रासकर व शेतकऱ्यांनी सुपा पोलिस स्टेशनला रीतसर फिर्याद दाखल केली होती. शेतकऱ्यांनी विहिरींना केमिकलयुक्त पाणी आल्याने प्रशासनाला कळविले होते. प्रशासनाने त्याची दखल न घेतल्याने (दि.२९ बुधवारी) सकाळी मनसेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष मनसे नेते रविश रासकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ व स्थानिक शेतकऱ्यांनी नगर - पुणे महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करून रसायन कंपनी मालक औद्योगिक वसाहतीच्या अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर मनसे नेते रविश रासकर यांनी रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी सरपंच रेश्मा पवार, रंगनाथ मगर, राजेंद्र मगर, रविंद्र मगर, संगिता मगर, जिजाबाई मगर, संदिप आढाव, पूजा मगर, विनोद परदेशी, नानासाहेब पारधी, अविनाश ठाणगे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते. सुपा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी पोलिस कर्मचाऱ्यांसह बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शासनाच्या वतीने उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण कक्ष यांनी नागरिकांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले.

## अवैधरित्या चालणाऱ्या लॅबवर मनसे टाकणार हातोडा !

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.३०, सुपा (अ.नगर) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी अहिल्या- नगर जिल्हा आरोग्य अधिकारी नागरगोजे साहेब यांना निवेदन देण्यात आले आहे की पारनेर तालुक्यात परवाना धारक लॅब किती आहेत व विना परवाना अवैधरीत्या चालविल्या जाणाऱ्या लॅब किती आहेत तसेच पारनेर तालुक्यातील जनतेच्या जीवाशी टेस्ट च्या नावाने खेळ मांडला जात आहे हे दुर्दैवी आहे.

> कोणीही लॅब टाकूशकत कोणी कितीही पैसे घेऊ शकतो याबाबत काहीही नियम अटी नाहीत. एका जिम्मेदार आरोग्य अधिकाऱ्यांनी बेजबाबदार वक्तव्य करणं दुर्दैवी आहे. त्यामुळे अधिकारिच अवैधरित्या चालु असलेल्या लॅब टोळीच्या मलिद्यातील वाट्याला सहभागी आहेत की काय असा प्रश्न पडला आहे. त्यामुळे लवकरच आरोग्य मंत्री यांना भेटून याबाबत माहिती देणार.
>
> **- मनसे नेते अविनाश पवार.**

पारनेर तालुक्यातील लॅब धारकांनी आपली स्वतःची ओळख, नावासह शिक्षण, तपशिल बोर्ड, तसेच विविध चाचण्या संदर्भात नियमावली फलक कोणत्याही लॅब मध्ये लावण्यात आले नाहीत.

तसेच किरकोळ आजारी असताना गरज नसताना सुद्धां वेगवेगळ्या चाचण्यांच्या नावाने लोकांकडून अव्वा चे सव्वा पैसे घेऊन लुट करीत आहेत तसेच लॅब मध्ये लेडीज आणि पुरुषांसाठी बाथरुम सह आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध नसताना सुद्धां लॅब च्या नावाने पारनेर तालुक्यात आरोग्य अधिकारी यांच्या कृपा आशिर्वादाने गोरख धंदा जोरदार चालू असल्याचा गंभीर आरोप पवार यांनी केला आहे तसेच दिवसेंदिवस यात वाढ होत असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या निदर्शनास आले आहे त्यामुळे परवाना धारक लॅब मध्ये विविध चाचण्या (टेस्ट) संदर्भात नियमावली फलक लावण्याचे बंधनकारक करण्यात यावे जे लॅब चालक नियमावली चे पालन करणार नाही.



त्यांचा परवाना रद्द करण्यात यावा तसेच विना परवाना अवैधरीत्या चालविल्या जाणाऱ्या लोकांच्या जिविताशी खेळणाऱ्या लॅब वर त्वरित गुन्हा दाखल करुन बंद कराव्यात जर आरोग्य अधिकारी यांनी यांची गांभीर्याने दखल घेतली नाही आणि आठ दिवसांत कारवाई चा लिखीत स्वरुपात खुलासा केला नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पारनेर तालुक्यातील अवैधरित्या चालविल्या जाणाऱ्या लोकांच्या जिविताशी खेळणाऱ्या लॅब वर मनसे स्टाईल दनका दिला जाईल व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर यास पुर्ण पणे जिल्हा आरोग्य अधिकारी अहिल्या- नगर, पारनेर तालुका आरोग्य अधिकारी जिम्मेदार राहिल असा इशारा मनसे माथाडी कामगार सेना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## कल्याण आरटीओचा वेगळा उपक्रम
### थेट गाव पाड्यावर जाऊन हेल्मेट वाटप



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३०, कल्याण :** ३५ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्या वतीने थेट मुरबाड तालुक्यातील तिवरपाडा या ठिकाणी तसेच गाव आणि पाड्यांमध्ये हेल्मेट वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश दुचाकीस्वारांमध्ये सुरक्षित वाहतुकीबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. या कार्यक्रमात परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला आणि हेल्मेटचे महत्त्व तसेच सुरक्षित वाहतुकीचे नियम नागरिकांना समजावून सांगितले.

सूत्रसंचालन सेफ्टी वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक व अध्यक्ष विशाल शेटे यांनी केले आणि त्यांनी उपस्थित नागरिकांना वाहतुकीचे नियम, रस्ता सुरक्षा आणि सुरक्षात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला त्यात काही अपंग व्यक्तींचा ही सहभाग लाभला त्या अपंग व्यक्तींना कल्याण आरटीओ चे अधिकारी अनिल धात्रक यांनी स्वतः हेलमेट घातले तसेच यावेळी अधिकारी गुंजाळ व सहकारी उपस्थित होते.या उपक्रमामुळे ग्रामीण भागात सुरक्षित वाहतुकीबाबत जनजागृती होण्यास मोठी मदत होणार आहे.

## खो-खो महाराष्ट्राचे दोन्ही संघांची घोडदौड
### पुरुष व महिला गटात कर्नाटकचा धुव्वा उडवीत उपांत्य फेरीत धडक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, हल्दवानी :** गतविजेत्या महाराष्ट्राच्या पुरुष व महिला खो खो संघांनी हल्दवानी येथे सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत कर्नाटकचा धुव्वा उडवीत उपांत्य फेरीत धडक दिली. महाराष्ट्राच्या पुरुष संघाने एक डाव १२ गुणांनी बाजी मारली, तर महिलांनी ६ गुणांनी विजय मिळवित आगेकूच केली.

पुरुष खोखो गटात महाराष्ट्राने कर्नाटकवर एक डाव १२ गुणांनी (३४-२२) मात केली. विजयी संघाकडून कर्णधार गजानन शेंगाळ (२.३० मि. संरक्षण व २ गुण), शुभम थोरात (१.४० मि., २.०५ मि. संरक्षण व ६ गुण), रामजी कश्यप (१.३५ मि. संरक्षण व ६ गुण), सौरभ आडावकर (१.४५ मि. संरक्षण व २ गुण) यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. कर्नाटककडून संघाप्पा (१.१० मि. संरक्षण व २ गुण), गौतम एम. के (६ गुण) यांनी दिलेली झुंज अपयशी ठरली. महिला गटात झालेल्या चुरशीच्या सामन्यात महाराष्ट्राने कर्नाटक संघावर ६ गुणांनी (३२-२६) मात केली. महाराष्ट्रच्या विजयात प्रियांका इंगळे (२ मि. संरक्षण व २ गुण), संध्या सुरवसे (२ मि. व १.२० मि. संरक्षण व ४ गुण), संपदा मोरे (०.५० मि. संरक्षण व १६ गुण), गौरी शिंदे (१.३० मि., १.४० मि. संरक्षण व २ गुण), अश्विनी शिंदे (१.३० मि., १.३० मि. संरक्षण) यांनी मोलाची कामगिरी बजावली. तर कर्नाटककडून मोनिका (१.२० मि., १.४० मि. संरक्षण व ६ गुण), चित्रा बी. (२.१० मि. संरक्षण व ४ गुण), तेजस्विनी के. आर. (१.३० मि. व १.२० मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ केला. मात्र, त्यांना महाराष्ट्राचा विजयरथ रोखण्यात यश आले नाही.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ घेण्यास सज्ज

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, बेलापूर (नवी मुंबई) :** येत्या २ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र गट- ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ ही परीक्षा पारदर्शकपणे घेण्यास आयोग सज्ज असून उमेदवारांनी अफवांवर विश्वास न ठेवता अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिव डॉ. सुवर्णा खरात यांनी केले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

डॉ. खरात म्हणाल्या की, दि.०२ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या 'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४' या परीक्षेच्या पूर्वीच प्रश्नपत्रिकांची उपलब्धता करुन देण्यासंदर्भात वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या चुकीच्या आहेत. सर्व प्रश्नपत्रिका अत्यंत कडेकोट बंदोबस्तात सुरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत आणि अशा कोणत्याही माहितीमध्ये तथ्य नाही. काही भ्रमणध्वनी क्रमांकांवरून उमेदवारांना प्रश्नपत्रिका मिळवण्याचे आमिष दाखवून पैशाची मागणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पुणे पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि पोलीस आयुक्त, पुणे यांच्या तर्फे या प्रकरणी योग्य ती कारवाई केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. उमेदवारांना अशा प्रकारचे दूरध्वनी आल्यास, contact-secretarympsc.gov.in या ईमेलवर तक्रार नोंदवावी.

महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ ही परीक्षा राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार आहे. या परीक्षेसाठी २ लाख ८६ हजार उमेदवार परीक्षा देणार आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त आणि व्यवस्था ठेवण्यात आली असल्याचेही डॉ खरात यांनी यावेळी सांगितले.

# संपादकीय



## शेतकऱ्याच्या अनुभवांचे बोल

वामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग याची चर्चा दहा-पंधरा वर्षांपूर्वी सुरू झाली. यामुळे तापमानवाढ होईल, हिमनद्या वितळतील, समुद्राची पातळी वाढेल, पाऊस अनियमित होईल, चक्रीवादळासारख्या आपत्ती वाढतील, तर दुसऱ्या बाजूला दुष्काळ, अतिवृष्टी हे तर निसर्गचक्रानुसार हजारो वर्षांपासूनच होत असल्याने त्याला कशाला घाबरायचे असा एक मतप्रवाह होता आणि आहेसुद्धा. हे सर्व खरे असले तरी त्या बदलाची तीव्रता आणि वारंवारिता ही चिंता करण्यासारखी बाब आहे. मागील पाच-सात वर्षांपासून हवामान बदलाची समस्या (तापमान वाढ, मोठा पाऊस, दुष्काळ, गारपीठ, पिकांवरील कीडरोग, इ.) सर्वांना जाणवत आहे. नोव्हेंबर-डिसेंबरातली एक बातमी अनेकांना आठवत असेल - शेवग्याच्या एका शेंगेची किंमत ३० रुपये झाल्याची ती बातमी. यामागचे कारण हवामान बदल हेच! कोणत्याही वनस्पतीच्या वाढीच्या दोन मुख्य अवस्था असतात. पहिली कायिक वाढ आणि दुसरी पुनरुत्पादक (फुले, फळे आणि बिया) वाढ. कायिक वाढ कशा पद्धतीने होते त्यावर त्या वनस्पतीला किती फळे लागणार हे ठरत असते. कायिक वाढ होण्यासाठी वातावरणीय घटक आणि शेतकरी अंगीकारत असणाऱ्या पद्धती म्हणजेच पाणी, खते देण्याच्या मात्रा, आंतरमशागत यांसारख्या कृती. तुलनेने कायिक वाढ ही वनस्पती शरीर क्रियाशास्त्राच्या दृष्टीने कमी गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. परंतु वनस्पतीला फुले लागणे आणि त्यांची फळधारणा होणे ही फार गुंतागुंतीची प्रक्रिया असते. कायिक वाढ कशा पद्धतीने झाली आहे यावर फुलांची संख्या ठरते मात्र फळे किती लागणार हे ठरण्यासाठी वातावरणीय घटक फार महत्त्वाचे ठरत असतात. या वर्षी शेवगा उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केली असता त्यांची तक्रार हमखास होती की शेवग्याच्या झाडांची वाढ खूप चांगली झाली होती. फुलेही खूप लागली होती. परंतु शेंगा त्या प्रमाणात लागल्या नाहीत. या वर्षी पाऊस चांगला झाला परंतु तो सर्वच पिकांबाबत चांगला ठरला नाही. त्यात हे शेवगा पीकही येते. लागवडीपासून साधारण ८ ते १० महिन्यांमध्ये शेंगा काढणीला येतात. पाऊस चांगला झाला झाडाची वाढ चांगली झाली परंतु कळी अवस्थेमध्ये पुन्हा पाऊस आला, परिणामी शेवग्याची फूल गळ झाली. शेंगा कमी लागल्या. फुलामध्ये फळधारणा होऊन त्याचे शेंगामध्ये रूपांतर न झाल्यामुळे हे घडले. कायिक वाढ थांबणे आणि त्यानंतर फुले अन् फळे लागणे या दोन अवस्थांची सरमिसळ वातावरणातील बदलामुळे होते. असाच अनुभव डाळिंब तसेच लिंबांच्या बाबतही येत आहे.

सोलापूर जिल्हा हा डाळिंब बागांसाठी प्रसिद्ध. परंतु बदलत्या वातावरणाचा परिणाम म्हणजे डाळिंब पिकावर तेल्या मररोगाचा प्रादुर्भाव वाढला, परिणामी त्या पिकाखालील क्षेत्र कमी झाले. मागील वर्षी वातावरण बदलामुळे पेरूची फळे काळी पडली या वर्षी पेरू चांगला आला परंतु भाव मिळाला नाही. सीताफळ पिकाला किडीने ग्रासले त्यामुळे त्याचेही भाव पडले आहेत. ही दोन्ही पिके परवडत नाहीत म्हणून शेतकरी बागा काढून टाकत आहेत. याचा एक अर्थ असा की हवामान बदलाच्या रेट्यामुळे पीक पद्धतीमध्येही तीव्र बदल होत आहेत. असे बदल आणि अन्न-पोषण सुरक्षा असाही विचार झाला पाहिजे. वातावरण बदलामुळे अनेक पिकांवरील कीडरोगाचे अनुभव नवीनच असल्यामुळे त्याच्या निवारणासाठीच्या पद्धती अजून ठरलेल्या नाहीत. हतबल शेतकरी त्याला सुचेल ते उपाय करीत आहे. परिणामी उत्पादन खर्च वाढत आहे. या सर्व घडामोडींमागेही हवामान बदल हे एक मुख्य कारण आहेच.

# मंदिरांतील वस्त्रसंहिता स्वागतार्हच !

देशभरातील लक्षावधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ड्रेसकोड लागू करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. मंदिर प्रशासनाने एक पत्रक काढून तसे जाहीर केले आहे.

मुंबईच्या मध्यवर्ती भागात दादर प्रभादेवी येथे वसलेल्या पुरातन श्री सिद्धिविनायक मंदिरात फार पूर्वीपासून भक्तांची गर्दी पाहायला मिळते. प्रतिदिन हजारो भक्तगण श्री गणरायाच्या चरणी लिन होण्यासाठी येतात. मंगळवारी आणि संकष्टी चतुर्थीच्या दिवशी हा आकडा काही लाखांच्या घरात जातो. आपल्या आराध्य देवतेच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देश आणि विदेशातील भाविकही याठिकाणी येत असतात. मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी सात्विकता जपली जावी यासाठी मंदिर प्रशासनाने नुकतेच एक पत्रक काढले असून मंदिरात येणाऱ्या भाविकांनी इतरांना संकोच वाटणार नाही यासाठी आपल्या संस्कृतीला साजेसे म्हणजे अंगभर कपडे परिधान करून यावे असे आवाहन या पत्रकातून केले आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यास मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही असेही या पत्रकात नमूद केले आहे. आजमितीला राज्यातील अनेक मंदिर प्रशासनांनी आपापल्या मंदिरांत भाविकांसाठी ड्रेसकोड अर्थात वस्त्रसंहिता लागू केली आहे.

भारतीय संस्कृतीची भुरळ आज साऱ्या जगाला आहे. त्यामुळेच प्रयागराज येथील महाकुंभातील सात्विकता अनुभवण्यासाठी आणि परमपवित्र गंगा नदीत डुबकी मारण्यासाठी हजारो विदेशी पर्यटक, सेलिब्रिटी कुंभनगरीत आले आहेत. प्राचीन हिंदू संस्कृती आणि मंदिरे देशाचा अनमोल ठेवा आहेत. आजवर या देशावर अनेक आक्रमकांनी हल्ले करून येथील वैभव लुटून नेले मात्र येथील संस्कृतीच्या खुणा त्यांना मिटवता आल्या नाही. या खुणा आणि त्यांचे पावित्र्य जतन करून ठेवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठे योगदान दिले आहे.

त्यामुळे ते पावित्र्य टिकवून ठेवण्याचे दायित्व आता आपल्या खांद्यावर आहे. महाराष्ट्रात जेव्हा मंदिरांतून वस्त्रसंहिता लागू करण्याचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा समाजातून जसे या भूमिकेचे स्वागत झाले तसा यास काही पुरोगामी मंडळींकडून विरोधही करण्यात आला. तरीही मागील दोन वर्षांत राज्यातील अनेक मंदिरांनी ड्रेसकोड लागू केले आहेत. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव काळात राज्यातील काही उत्सव मंडळांनीही श्रीच्या मंडपात वस्त्रसंहितेचे पालन करणे बंधनकारक केले. दक्षिण भारतातील अनेक मंदिरांत मागील शेकडो वर्षांपासून वस्त्रसंहिता लागू करण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी महाराष्ट्रातून जाणारे भाविक त्याचे तंतोतंत पालन करतात, मग राज्यातील वस्त्रसंहितेला विरोध का ? मंदिरांच्या गाभाऱ्यात जाताना पुरुषांनी सोवळे आणि स्त्रियांनी साडी नेसावी ही प्रथा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे, हे आपणा सर्वांना ज्ञात आहे, मग मंदिर परिसरातील वस्त्रसंहितेला आक्षेप नेमका कशासाठी ? मुळात मंदिरे ही काही सहलीची ठिकाणे नाहीत कि ज्या ठिकाणी कोणी मौज मजेसाठी यावे. मंदिरात येणाऱ्या प्रत्येकाला त्या देवतेचे दर्शन घ्यायचे असते, देवतेच्या मूर्तितून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करायचे असते, आपले मागणे देवापुढे मांडायचे असते याचाच अर्थ तिथे देव प्रत्यक्ष आहे आणि तो आपले म्हणणे ऐकणार आहे अशी श्रद्धा येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात असते मग त्या देवतेच्या ठिकाणचे पावित्र्य जपणे आपले कर्तव्य नव्हे का ? मुलांना शाळेत पाठवताना आपण शाळांनी ठरवून दिलेला गणवेश घालून त्यांना पाठवतो, कार्पोरेट कार्यालयांतही कपड्यांच्या बाबतीत कंपनीने घालून दिलेले नियम कर्मचाऱ्यांना पाळावे लागतात. रुग्णालये, न्यायालये, पोलीस, टपाल कार्यालय सर्वच ठिकाणी ड्रेसकोड आहेत आणि वर्षोनुवर्षे या ड्रेसकोडचे पालन होत आलेले आहे, मग देवालयांत जाताना आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा कशी बरे येते ? कोरोना काळात कोरोना रुग्णांना भेटायला जाताना पीपीई किट परिधान करून जाणे बंधनकारक करण्यात आले होते त्यावेळी ते नियम डॉक्टरांनी केले होते म्हणून आपण सर्वांनीच ते पाळले. मग धार्मिक स्थळांच्या बाबतीत धर्म आणि अध्यात्मशास्त्र जाणणाऱ्या मंडळींनी केलेले नियम आपल्याला मान्य का होत नाहीत ? चित्रपटात अंग प्रदर्शन करणाऱ्या हॉलिवूड-बॉलिवूडमधील नायिकाही मंदिरांत जाताना साजेशी वस्त्र परिधान करतात, डोक्यावर पदर घेतात मग आपण या नियमांना विरोध करून नेमके कोणते पुढारलेपण दाखवत आहोत ? पुरातन मंदिरे ज्यावेळी निर्माण करण्यात आली त्यावेळी सामान्य लोकांचे पोशाख हे सात्विक आणि धर्माला अनुसरून होते त्यामुळे त्यावेळी वस्त्रसंहिता बनवण्याची गरजच निर्माण झालेली नव्हती. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा पगडा, धार्मिक स्थळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला गेल्याने वस्त्रसंहिता लागू करणे आज अनिवार्य झाले आहे. मंदिरे ही पर्यटनाची केंद्रे नसून ती धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी योग्य ती शुचिर्भूतता पाळली जावी, मंदिरांचे पावित्र्य राखले जावे, मंदिरांत येणाऱ्या भाविकांचा देवतेप्रतीचा भाव टिकून राहावा यासाठी तोकडे आणि निषिद्ध कपडे परिधान करून मंदिरांत प्रवेश करण्यास अनेक देवस्थानांकडून घालण्यात आलेली बंदी स्वागतार्ह आहे.




**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## देशासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांना आदरांजली



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, पनवेल :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार आज गुरुवारी सकाळी ठिक ११.०० वाजता पनवेल महानगरपालिका मुख्यालयासमोरील प्रवेश द्वाराजवळ महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दोन मिनीटे मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.

### उच्छाद..

अश्लाघ्य घडे घटना
सर्वत्र उडतो उच्छाद
राईचापर्वत करतात
आगीतहोरफळे वाद

गांभीर्य खरे कुणाला
करत राही प्रति वाद
आरोपप्रतिआरोपात
हरवून गेलायं संवाद

भेटाया उसळे सगळे
मिडियास मिळे खाद
विसरत चालले दुःख
खपल्या काढूनि याद

राज कारणी मुरलेले
असे चाणाक्ष उस्ताद
सामनाकरे संकटाशी
रे नेहमीतयार इस्ताद

करु सखोल चौकशी
शांतवू पाहते विवाद
सर्वात सोपे काम ते
नेमून टाकला लवाद

काय झाले हो पुढे ते
कुणालाराहणारं याद
मस्त चाले राज्यकर्ते
आतातरी टळते ब्याद

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# राजकिय पक्ष 'मालामाल' - जनता 'कंगाल'



राजकारण हे समाजसेवेचे पवित्र माध्यम आहे ही जाणीव ठेवून अनेकांनी आपले आयुष्य खर्ची घातले, समाजसेवेचे व्रत हाती घेतले आणि निस्वार्थीपणे समाजाची सेवा केली असे अनेक नेते, समाजसेवक होऊन गेले, मात्र कालानुरूप राजकारण आणि सत्ताकारणाचे संदर्भच बदलुन गेले आहे आणि सत्तेतून पैसा आणि पैशातुन सत्ता मिळवण्यासाठी सगळेच राजकिय पक्ष, नेते हे लोकसेवक, जनसेवक राहिले नाही तर गल्लाभरू स्वार्थी राजकारणी बनले आहेत. निस्वार्थीपणे समाज सेवा ही संकल्पना कधीच कालबाह्य झाली आहे, आणि स्वतःची पदरमोड करून, तन मन धन अर्पण करून समाजसेवा करणारे लोकसेवक, राजकिय पक्ष नावाला देखील ऊरले नाहीत तर याऊलट सत्तेतून पैसा आणि पैशातुन सत्ता मिळते हे लक्षात आल्याने राजकारण आणि सत्ताकारण हा पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे आणि निवडणूका हा पैशाचा खेळ बनला आहे. कधीकाळी जनतेकडून पदर पसरुन एक एक रुपया मागुन राजकीय पक्ष, नेते निस्वार्थीपणे, तन मन धन अर्पण करून समाजसेवा करीत असत, म्हणूनच अशा नेत्यांना समाजात लोकनेते म्हणून ओळखले जायचे आणि जनतेमध्ये आदर असायचा. केलेल्या कामाची पुंजी आणि समाजात कमावलेले नाव ही च त्यांची आयुष्यभराची कमाई असायची आणि राजकिय पक्ष देखील एक एक रुपया जनतेकडून घेत पक्ष चालवत असत,मात्र काळानुरूप राजकारण आणि सत्ताकारणाचे सगळेच संदर्भ बदलले आहेत.

आताच्या काळात राजकीय पक्ष, त्यांचे नेते, कार्यकर्ते यांची संपत्ती, अल्पावधीतच झालेली वाढ डोळे दिपवून टाकते, लाखो, करोडों शिवाय बातच नाही. राजकीय पक्षांकडे, नेत्यांकडे करोडो रुपयांची संपत्ती जमा झाली आहे.याच संदर्भात विविध राजकीय पक्षांची मार्च २०२४ अखेरची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. अर्थातच भाजप देशातील सर्वात श्रीमंत राजकीय पक्ष ठरला असुन त्याच्याकडे जवळपास सात हजार दोनशे कोटी रुपयांची तर कॉंग्रेसकडे आठशे साठ कोटी रुपये जमा असल्याचे समोर आले आहे, ईतर राजकीय पक्षांच्या रकमेतही वाढ झाली आहे. ही तर मार्च २०२४ अखेरची आकडेवारी असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. त्यानंतर अजुन किती वाढ झाली आहे हे कालांतराने समोर येईलच. राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यात पारदर्शकता यावी म्हणून निवडणूक रोखे योजना आणली गेली मात्र त्याची पोलखोल न्यायव्यवस्थेनेच केली आणि ही योजना घटनाबाह्य ठरवली. रोखे योजनेत ईडी, सिबीआय, सारख्या तपासणी यंत्रणाचा देखील कसा वापर करण्यात आला हे देशासमोर आले, आणि राजकिय पक्षांना करोडो रुपये कसे मिळाले याचे गुपित उघड झाले.२०१४ अगोदर भाजप ची आर्थिक स्थिती आणि आजची आर्थिक स्थिती यात जमीन अस्मानाचा फरक आहे.याच काळात देशभर भाजपची पंचतारांकित कार्यालये थाटली गेली, नेते, कार्यकर्ते यांचे रहाणीमान सुधारले, आर्थिक परिस्थिती सुधारली ती याच पैशातुन, मात्र हे सगळ्याच राजकीय पक्ष, नेत्यांना लागु आहे. आज कोणत्याही पक्षाचा साधा गल्लीतला कार्यकर्ता देखील अल्पावधीत कोट्याधिश होतो. राजकीय पक्ष चालवायला, निवडणुका लढवायला पैसा लागतो हे मान्यच पण त्यासाठी करोडो रुपये हवेत कश्यासाठी?मग याच पैशातुन जनतेला मतदानाच्या आदल्या रात्री लक्ष्मी दर्शन घडवले जाते, रेवड्यांची खैरात केली जाते, पाकिटे सप्रेम भेट दिली जातात आणि निवडणूकीत मताची किंमत लावली जाते आणि निवडणूका जिंकल्या जातात आणि मग पाच वर्षे या नि त्या कारणाने चहूबाजूंनी जनतेलाच लुटले जाते आणि आपापले खिसे भरून घेतले जातात, हे सवलतींचा आवळा देऊन कोहळा काढण्यासारखे आहे. भाजप काय किंवा कॉंग्रेस वा ईतर पक्ष यांना एवढ्या करोडो रुपयांच्या देणग्या देतो कोण हे 'ये पब्लिक है ये सब जानती है ' कार्पोरेट सेक्टर, बांधकाम व्यावसायिक, मोठ मोठ्या कंपन्या यांच्या कडुनच करोडो रुपये राजकीय पक्षांना सढळहस्ते दिले जातात ते काही ऊदार हेतु ठेवून नाही तर एका हाताने द्या दुसऱ्या हाताने घ्या या देवाणघेवाणीच्या व्यवहारातुनच. म्हणूनच सत्ताधारी पक्ष मग तो कोणीही असो कार्पोरेट सेक्टर वर मेहरबान असतो आणि जिथे टॅक्स वाढवण्याची गरज आहे तिथे टॅक्स कमी केला जातो आणि करोडो रुपये कमावणाऱ्यांची तोट्याचा कारण दाखवून कर्ज माफी दिली जाते, गेल्या दहा वर्षांत विविध बॅंकांनी सहेतुक कर्ज बुडवणाऱ्या बड्या धेंडाचे जवळपास चौदा लाख कोटी रुपयांचे बुडित कर्ज माफ केले आणि मग याच बुडव्यांनी निवडणूक रोखे योजनेच्या माध्यमातून करोडो रुपयांचे रोखे खरेदी करून विविध राजकीय पक्षांना दिले, त्याचा सर्वात मोठा लाभार्थी 'भाजप' ठरला आहे.

राजकीय पक्षांकडे पैसा मालमत्ता नसावी असे कोणीच म्हणत नाही, मात्र इतक्या मोठ्या प्रमाणावर पक्ष, नेते, कार्यकर्ते यांच्याकडे एवढा पैसा येतो कुठुन?, त्याचे स्त्रोत काय, वैध - अवैध मार्गाने जमा होतो का? हे तर देशातील जनतसमोर यायला हवे, ईतर वेळी पारदर्शकतेचा आग्रह धरणारे मात्र आपल्याला मिळणाऱ्या पैशाबाबत पारदर्शकता बाळगत नाही. आजच्या घडीला श्रीमंत गरीब दरी वाढत आहे, आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा सगळेच महाग झाले आहे, जनतेला रोजचे जगणे मुश्किल झाले आहे, देशातील ८१ टक्के जनतेला पाच किलो रेशन मोफत द्यावे लागते आहे, गरीब, मध्यमवर्गीय यांचे जगणे मुश्किल झाले आहे अशावेळी राजकीय पक्षांकडे करोडो रुपये येतात तरी कुठुन, महागाई, बेरोजगारी च्या काळात एवढी मोठी रक्कम देतो तरी कोण? आणि देणाऱ्यांना परवडते तरी कसे? कि देण्याच्या बदल्यात आवळा देऊन कोहळा काढण्यासारखा काहीसा आतबट्ट्याचा व्यवहार चालतो?

हे सगळं पहाताऐंशी टक्के राजकारण आणि वीस टक्के समाजकारण हे समीकरण बदलले असुन शंभर टक्के सत्ताकारण आणि अर्थकारण हेच आजचे राजकारण झाले आहे,त्यामुळे राजकिय 'मालामाल' तर जनता 'कंगाल'असे देशातील वास्तव आहे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जिल्हा व्यापारी महासंघाचे विविध मागण्यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.३०, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यातील व्यापार्यांच्या विविध म ागण्यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील व्यापार्यांना शांतता कमिटीमध्ये सहभागी करुन घ्यावे, तसेच 'एक कॅमेरा नागरिकांच्या सुरक्षेसाठी' अभियानांतर्गत सर्व व्यापारी आपापल्या दुकानासमोर सीसीटीव्ही कॅमेरा लावणार असल्याची माहिती जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी दिली. धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाच्या पदाधिकार्यांसमवेत नुकतीच एक बैठक जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्यासमवेत झाली. या बैठकीच्या अनुषंगाने नागरिकांच्या सुरक्षेसाठी दुकानांसमोर सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यासंदर्भात सूचना करण्यात आली होती. या सूचनेचे व्यापारी महासंघाने स्वागत करुन लवकरच सर्व व्यापारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आपापल्या दुकानांसमोर सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याचे आश्वासन व्यापारी म हासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी दिले. धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघ हा गेल्या ५० वर्षांपासून कार्यरत असून सर्व तालुक्यात व्यापारी महासंघाचे संघटन पसरलेले आहे. देशातील सर्व व्यापार्यांची शिखर संस्था म्हणून ही संस्था कार्यरत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इन्डस्ट्री अ‍ॅन्ड अ‍ॅग्रीकल्चर व कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स या नामांकित संस्थांसोबत धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघ संलग्नित आहे. जिल्ह्यात जबरदस्तीने वर्गणीच्या नावाखाली खंडणी मागणार्यांची संख्या जास्त होती. त्याला आळा बसविण्यासाठी व्यापारी महासंघाने पुढाकार घेऊन व्यापार्यांची होणारी लूट थांबविली होती. त्याकरिता व्यापारी महासंघाच्या सदस्यांना बोर्डाचे वाटप देखील करण्यात आले होते. याचा आदर्श संपूर्ण महाराष्ट्रातील व्यापारी बांधवांनी घेतला होता. यापुढे ही परंपरा कायम सुरु राहण्यासाठी व्यापारी महासंघाला सहकार्य करावे अशी अपेक्षा जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी यावेळी व्यक्त केली. तत्पूर्वी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या हस्ते सदस्य नोंदणी बोर्डाचे उदघाटन करण्यात आले. बैठकीस जिल्हा व्यापारी महासंघाचे सचिव महेश वडगावकर, संघटन सचिव अभिलाष लोमटे, व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष नितीन फंड, अजहर खान, श्याम बजाज, सुभाष शेट्टी, बापू सूर्यवंशी, संपतराव डोके, कपील शर्मा व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## फटाका कारखान्याच्या स्पोटातील जखमी मजुरांना तात्काळ मदत करण्याची मागणी



**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.३०, कळंब (धाराशिव) :** वाशी तालुक्यातील मौजे तेरखेडा येथील फटाका कारखान्यात दि.२९ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या स्पोटातील जखमी कामगार मजुरांना अर्थसहाय्य, कपडे व अन्नधान्य तात्काळ उपलब्ध करून द्यावे. अशी मागणी श्रमिक मानवाधिकार संघाच्या वतीने वाशी येथील ज्येष्ठ साहित्यिक श्रावण भाऊ क्षिरसागर यांच्या नेतृत्वाखाली कळंबचे उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, वाशी तालुक्यातील मौजे तेरखेडा येथील शिवारात गट नंबर १२८१ मध्ये दि.२९ जानेववारी २०२५ रोजी दुपारी २ ते अडीच वाजण्याच्या सुमारास छोटुमियॉ दारुवाले यांच्या मालकीचा बाबा फायर या फटाके निर्मितीच्या गोदामामध्ये स्पोट होउन अंदाजे ८ मजुर गंभीर जखमी झालेले आहेत. त्या जखमी मजुरांना अर्थिक सहाय्य व अन्नधान्य तात्काळ पुरवठा करावा. तसेच जखमी झालेल्या मजुरांचा विमा उतरवलेला आहे का? फटाका कारखाना मालकांनी कायदेशीर बाबींची पूर्तता केली आहे का? याची चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच या फटाका कारखान्याबाबत आपल्या कार्यालयास या पुर्वी ही सदरील कारखान्याची व मजुरांची चौकशी करावी म्हणून निवेदन देण्यात आले होते परंतु सदरील निवेदनावर कसल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सदरील प्रकरण गंभीर असून या निवेदनावर तात्काळ कार्यवाही करावी. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर श्रमिक मानवाधिकार संघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर श्रमिक म ानवाधिकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भाई बजरंग ताटे, मानवी हक्क अभियान च्या जिल्हा अध्यक्षा माया शिंदे, मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, ज्येष्ठ साहित्यिक (महाराष्ट्र राज्य) श्रावण भाऊ क्षीरसागर यांच्या स्वाक्षर्या आहेत.

## मिनकीच्या आत्महत्याग्रस्त कुटुंबास सोशल मिडीयाच्या माध्यमातून दीड लाखाची मदत



राजु पाटील | सय्यद रियाज

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३०, मुदखेड (नांदेड) :** बिलोली तालुक्यातील मौ.मिनकी येथील शेतकरी पिता-पुत्रांनी दिनांक ०९ जानेवारी २०२५ रोजी झाडाला दोरखंडानी गळफास लाऊन आत्महत्या केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र हळहळले. या घटनेची शेतकरी नेते व सामाजिक कार्यकर्त्यांनी अर्थिक मदतीच्या पुढाकारामुळे सोशल मिडीयाच्या माध्यमातून दीड लाख अर्थिक मदत मिळुन दिल्याने तालुक्यांसह जिल्हाभरातुन त्यांचे कौतुक होत आहे. मिनकी येथील त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची ही नुसती सांत्वन भेट ठरू नये व आर्थिक अडचणीत असणाऱ्या या पैलवार कुटुंबाला मदत व्हावी. या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते राजु पाटील शिंपाळकर व सय्यद रियाज यानी अर्थिक मदतीचा संकल्प करुन सदरी ग्रुपचे नाव 'मिनकी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला आर्थिक मदत' या नावाने व्हाट्सअप ग्रुप सुरू केले. या ग्रुपमध्ये परिचयातील दानशूर व्यक्तींना समाविष्ट करुन आर्थिक मदतीचे आव्हान केले. या आव्हानांला दानशुरांनी प्रतिसाद देत पैलवार यांचा फोन पै व क्युआर कोड च्या माध्यमातून १७० दानशूर व्यक्तींनी १ लाख ५२ हजारांची या माध्यमांतून अर्थिक मदत केली. यासाठी शेतकरी नेते कैलास येसगे कावळगावकर, सुधीर बिंदू, संतोष गव्हाणे, अर्धापूरचे शेख जाकीर, सुभाष कदम, बालाजी पेटेकर, एम.एस.भुराळे यांचे ही मौलाचे सहकार्य मिळाले. व अजूनही मदतीचा ओघ चालूच आहे. सोशल मीडियाच्या माध्यमांतून एवढी मोठी मदत उभी करून दिल्याबद्दल तालुक्यांसह जिल्हाभरातुन या उपक्रमाचे कौतुक होते आहे.

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित आठव्या युवा संसदेचे उद्घाटन संपन्न

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.३०, खडकवासला (पुणे) :** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस तर्फे आयोजित आठव्या युवा संसदेचे उद्घाटन नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात झाले. यावेळी माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष अ‍ॅड.शार्दुल जाधवर यावेळी उपस्थित होते. संस्थेच्या 'उडान' या अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार अरविंद सावंत यांना आदर्श खासदार पुरस्कार, सुधीर मुनगंटीवार, सत्यजित देशमुख आणि अमित गोरखे यांना आदर्श आमदार पुरस्कार, विठ्ठल काटे यांना आदर्श नगरसेवक पुरस्कार, सचिन शेलार यांना आदर्श सरपंच पुरस्कार, अ‍ॅड. मंगेश ससाणे यांना आदर्श युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, पुणेरी पगडी असे पुरस्काराचे स्वरूप होते.



**चंद्रकांत पाटील म्हणाले,** केवळ राजकीय फायद्यासाठी विरोधकांनी देशाचे संविधान बदलण्यात येणार असल्याचा गैरसमज समाजामध्ये पसरविला. त्याचा काहीसा राजकीय लाभ त्यांना मिळाला आहे, परंतु देशातील लोक अशा अफवांना बळी पडणार नाहीत. देशाचे संविधान कोणालाही बदलता येणार नाही त्यामध्ये केवळ दुरुस्ती करता येते, अशा प्रकारे संविधानामध्ये अनेकदा दुरुस्ती करण्यात आली आहे, असे राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केवळ चांगले शिक्षण देत नाही तर एक समृद्ध पिढी घडवत आहे. या संस्थेने कायमच नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तरुण निर्माण केले आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना अधिक बळकटी देण्यासाठी राज्य सरकार जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट या संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा देण्याचा विचार करत आहे आणि त्या संदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल.

**सुधीर मुनगंटीवार म्हणाले,** राजकारणाबद्दल तळागाळामध्ये द्वेष आणि चीड निर्माण झाली आहे. परंतु अशा प्रकारे राजकारणाबद्दल द्वेष का निर्माण झाला आहे याचाही विचार करणे गरजेचे आहे. अनेकजण आज केवळ पैसा मिळवण्यासाठी राजकारणामध्ये येतात हा विचार सर्वसामान्यांमध्ये रुजला आहे, परंतु राजकारण हे समाजकारण करण्याचे एक साधन आहे. ही भावना आजच्या तरुणांमध्ये रुजवली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समृद्ध भारत घडू शकेल. राजकारणामध्ये तरुणांनी जाऊ नये हा भ्रम दूर केला पाहिजे, तसेच राजकारण म्हणजे केवळ निवडणूक हा गैरसमजही दूर झाला पाहिजे. निवडणूक हे राजकारणामध्ये येण्याचे केवळ एक माध्यम आहे परंतु निवडणूक म्हणजे राजकारण नाही.

**भागवत कराड म्हणाले,** युवा संसदेच्या म ाध्यमातून निर्माण झालेले तरुण हे उद्याचा बलशाली भारत घडविणार आहेत. सशक्त भारत घडविण्यासाठी संस्कारक्षम तरुण पिढीची गरज आहे. आज संस्कारक्षम तरुण घडविण्याचे काम जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट शिक्षण आणि युवा संसदेच्या माध्यमातून करत आहे. युवकांनी राजकारणामध्ये निश्चितच आले पाहिजे, परंतु राजकारणामध्ये येताना आपण कशासाठी राजकारणाम ध्ये येणार आहोत हे स्पष्ट पाहिजे. अन्यथा केवळ पैसा आणि सत्तेसाठी राजकारणामध्ये आलात तर त्या ठिकाणी फार काळ टिकू शकत नाही.

**अरविंद सावंत म्हणाले,** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जात, धर्म, पंथ विसरून सम ाजासाठी एकत्र यावा, असे आवाहन केले होते. परंतु आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये जात आणि धर्मावरून वाद निर्माण होत आहेत. ही भांडणे लावणारे लोक मात्र सत्तेचा आनंद घेत आहे हे सर्व सामान्य लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. आजचे राजकारण हे सुसंस्कृत राजकारण राहिलेले नाही या राजकारणामधून समाजकारण कधीच दूर गेले आहे. केवळ सत्ता आणि पैसा याचे समीकरण जुळवण्यासाठी आज लोक राजकारणामध्ये येत आहे अशा प्रसंगी सर्वसामान्य माणूस कसा राजकारणामध्ये येऊ शकतो आणि समाजासाठी काम करू शकतो असा प्रश्न निर्माण झाला आहे, परंतु तरीही एक सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटने युवा संसदेच्या माध्यमातून तरुण घडविण्याचे काम केले आहे हे निश्चितच वाखाणण्यासारखे आहे.

**सत्यजित देशमुख म्हणाले,** राजकारणाविषयी चेतना जागवण्याचे काम जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट करत आहे यामधून निश्चितच उद्याचे उज्वल भवितव्य घडणार आहे. मी माझ्या सांगली कार्यक्षेत्रामध्ये ताडोबा अभयारण्याच्या धर्तीवर सह्याद्री व्याघ्र प्रकल्प उभा केला हा प्रकल्प उभा करण्यासाठी तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे मला खूप कार्य लागले हा व्याघ्र प्रकल्प जागतिक वारसा लाभलेला व्याघ्र प्रकल्प आहे.

**अमित गोरखे म्हणाले,** सामाजिक क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी सातत्य महत्वाचे असते. हेच सातत्य जाधवर ग्रुप इन्स्टिट्यूट ने शैक्षणिक क्षेत्राम ध्ये दाखवले आहे. त्यामुळेच जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट निश्चितच काही दिवसात जाधवर अभिमत विद्यापीठ मध्ये रुपांतरीत होऊ शकेल. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चा केवळ शैक्षणिक क्षेत्रामध्येच नव्हे तर समाज उभारणीमध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

**विठ्ठल काटे म्हणाले,** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट हे एका आदर्श शिक्षण संस्थेचे उदाहरण आहे. या शिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देऊन नोकरीसाठी तयार केले जात नाही तर उद्याचे उज्वल भविष्य निर्माण करणारे तरुण या इन्स्टिट्यूट मध्ये घडविले जातात या विद्यार्थ्यांमधूनच उद्याचे कर्तृत्ववान राजकारणी निर्माण होणार आहेत. या राजकारण्यांनी अशा प्रकारच्या युवा संसदेच्या माध्यम ातून शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यात निश्चितच सकारात्म क दृष्टिकोन जागृत असेल आणि त्याचा निश्चितच समाजाला आणि देशाला फायदा होईल.

**अ‍ॅड. शार्दुल जाधवर म्हणाले,** आज संस्थेमध्ये भरलेल्या विद्यार्थ्यांचा मेळावा महत्त्वाचा आहे. कारण हेच विद्यार्थी उद्याचे भविष्य आहे. राजकारणा संदर्भात तरुण सुशिक्षित व्हावा त्यांच्या मध्ये राजकारणाविषयी जागृती निर्माण व्हावी, हा या युवा संसद आयोजित करण्याचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश निश्चितच सफल होत आहे. या युवा संसदेतील प्रेरणा घेऊन उद्याचे चांगले नेतृत्व निर्माण झाले, तर त्यातूनच सशक्त भारत निर्माण होणार आहे.

## खासदार निलेश लंके यांची महापालिकेत आढावा बैठक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** शहरातील विविध प्रश्न संदर्भात खा.निलेश लंके यांनी महापालिकेत आयुक्त यशवंत डांगे यांच्या समवेत बैठक घेऊन चर्चा केली यामध्ये ३०५-५०६ सफाई कामगारांच्या नोकरीचा प्रश्न प्रलंबित आहे. हा प्रश्न मार्गी लागावा. यासाठी आयुक्त यांच्याकडे शासन निर्णयाची व कोर्टाने दिलेल्या अध्यक्षाची प्रत दिली मात्र आयुक्त सकारात्मक निर्णय घेण्यास तयार नसल्यामुळे थेट प्रधान सचिवांशी फोनवरून बोलणे झाले असल्यामुळे हा प्रश्न येत्या २-४ दिवसात मार्गी लागेल याचबरोबर २०१९ पासून शहरात गॅस पाईपलाईन योजनेचे काम चालू असून ते समाधानकारक नाही.

महापालिकेने ४ प्रभागांमध्ये काम करण्याची परवानगी दिली असली तरी ते काम अजून पर्यंत पूर्ण झाले नाही. तरी ते काम येत्या ४ महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश दिले आहे. उर्वरित कामासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करणार आहे नेहरू मार्केट जागेम ध्ये महापालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणार असून या ठिकाणी भाजी विक्रेत्यांना प्राधान्यक्रम देण्यासाठी सूचना केल्या आहे. महापालिकेच्या गाळेधारकांच्या भाडेवाडीचा प्रश्न गेल्या २०१५ सालापासून प्रलंबित आहे.

महापालिका आता वसुलीसाठी त्यांचे दुकान सील करीत आहे यावरती तोडगा काढण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार आहे असल्याचे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले. शहरातील विविध प्रश्न संदर्भात खासदार निलेश लंके यांनी महापालिकेत



आयुक्त यांच्या समवेत आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक दीप चव्हाण, शिवसेनेचे नेते राजेंद्र दळवी, गिरीश जाधव, माजी नगरसेवक योगीराज गाडे, भैय्या परदेशी, रेवजी नांगरे, दिलदार सिंगबिर, संजय झिंजे आदींसह अधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्राच्या पूजा दानोळेची सुवर्णभरारी; सायकलिंगमध्ये कोल्हापूरमधील पैलवानांच्या कन्येचे यश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, उत्तराखंड :** उत्तराखंडातील ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत कोल्हापूरच्या पूजा दानोळेने सुवर्णपदक पटकावून आपल्या लौकिकला साजेशी कामगिरी केली. घरची पार्श्वभूमी पैलवानांची असली तरीही महाराष्ट्राच्या पूजा दानोळे हिने सायकलिंग मध्ये करिअर करताना ३० किलोमीटर टाईम ट्रायल या क्रीडा प्रकारात आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा सिद्ध करून दिवस गाजविला.

डोंगर दर्यातील रुद्रपूरमधील सायकलिंगच्या टाईम ट्रायल या क्रीडा प्रकारात तिने तीस किलोमीटरचे अंतर ४५ मिनिटे व ३०.३७४ सेकंदात पार करीत सोनेरी यशाला गवसणी घातली. टाईम ट्रायल म्हणजे पूजा असेच सम ीकरण सायकलिंग मध्ये मानले जाते. कोल्हापूर जिल्ह्यातील इंगळी या



गावातील खेळाडू पूजा हिने आजपर्यंत मुलींच्या १४, १६ व १८ वर्षाखालील गटात तसेच वरिष्ठ महिलांच्या गटात याच क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्तरावर सातत्याने सुवर्ण पदकांचीच कमाई केली आहे. आजही तिने सुरुवातीपासूनच शेवटपर्यंत वेळ व वेग या दृष्टीने योग्य नियोजन केले होते त्यामुळेच तिला येथे पुन्हा विजेतेपदाचा मान मिळाला. पुन्हा एकदा सुवर्णपदक मिळाल्यामुळे मला खूपच आनंद झाला असून ही काम गिरी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यासाठी ऊर्जा देणारी असल्याचे पूजाने पदक वितरणानंतर सांगितले.

पूजा हिचे वडील बबन दानोळे व भाऊ हर्षद हे दोघेही नामवंत कुस्तीगीर आहेत. मात्र तिला फारशी कुस्तीची आवड नव्हती सुरुवातीला तिने ट्रायथलॉन मध्ये करिअर करण्याचे ठरविले होते .मात्र घरच्यांच्या आग्रहाखातर आणि सहकार्याने तिने सायकलिंग मध्ये करिअर सुरू केले. २०१६ मध्ये तिने ज्येष्ठ प्रशिक्षक दिपाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सायकलिंगचा प्राथमिक ज्ञान आत्मसात केले त्यानंतर तिने मिळवलेल्या वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये यश पाहून भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या नवी दिल्ली येथील प्रशिक्षण केंद्रात तिची निवड झाली. तिला तेथे अनिल कुमार यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

आजपर्यंत तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर एक रौप्य व दोन कांस्य पदके जिंकली आहेत. ती इचलकरंजी येथील न्यू इंग्लिश स्कूल खंजिरे शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात वाणिज्य शाखेत शेवटच्या वर्षाला आहे. उत्तराखंडातील ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील महाराष्ट्राचे हे तिसरे सुवर्णपदक आहे. स्पर्धेच्या उद्घाटनापूर्वी ट्रायथलॉन मध्ये २ सुवर्णपदकेजिंकून महाराष्ट्राने दमदार कामगिरी केली होती. ३ सुवर्णपदकांसह महाराष्ट्र मणिपूर, हरियाणा पाठोपाठ तिसर्या स्थानावर आहे.

# रिक्षा टॅक्सी भाडेदर वाढ १ आजपासून लागू

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, ठाणे :** मोटार वाहन कायदा, १९८८ कलम ६८ अन्वये, राज्य शासनाकडून मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण समिती गठीत करण्यात आलेली आहे. या प्राधिकरणाची बैठक नुकतीच अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई व अपर परिवहन आयुक्त यांच्या उपस्थितीत पार पडली.

**या बैठकीमध्ये पुढिलप्रमाणे महत्वाचे निर्णय घेण्यात आले.**

१. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) भाडेदर वाढ.

काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षांचे भाडेदर सूत्र विहित करण्याबाबत शासनाने दि.१० ऑक्टोबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये बी.सी. खटुआ समितीची स्थापना केली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी बाबत शासनाने दि.९ मार्च २०२० रोजी शासन निर्णय जारी केला आहे.

खटुआ समितीच्या अहवालास शासनाने दि.९ मार्च २०२० रोजीच्या निर्णयाद्वारे मान्य केलेल्या काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) भाडे निश्चितीच्या सूत्रानुसार व वाहनाची सरासरी किंमत, ग्राहक निर्देशांक, वाहन कर्जाचा व्याजदर इत्यादी बाबी विचारात घेवून भाड्याची परिगणना केली जाते. यापूर्वी मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि.२६ सप्टेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत भाडेदर सुधारणा करण्यात आली होती.

त्यानंतर वाहनाची सरासरी किंमत, ग्राहक निर्देशांक, वाहन कर्जाचा व्याजदर इत्यादी बाबी वाढ झाल्यामुळे प्राधिकरणाने काळी-पिवळी टॅक्सी व रिक्षाचे भाडेदर वाढ करण्याचा निर्णय घेतला.

अ) काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) साठी पूर्वीचे प्रति किमी रु.१८.६६ वरून रु.२०.६६ भाडेदर सुधारणा करण्यात आली. आता काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) साठी किमान देय प्रति १.५ किमी भाडे रू.२८/- वरून रु.३१/- भाडेदर असणार आहे.

ब) कुलकॅबसाठी पूर्वीचे प्रति किमी भाडे रु. २६.७१ वरून रु. ३७.२ (२०% वाढीप्रमाणे) भाडेदर सुधारणा करण्यात आली. आता कुलकॅब साठी किमान देय प्रति १.५ किमी भाडे रु. ४०/- वरून रु. ४८/- (२०% वाढीप्रमाणे) भाडेदर असणार आहे.

क) ऑटोरिक्षा (सीएनजी) साठी पूर्वीचे प्रति किमी भाडे रु. १५.३३ वरून रु १७.१४/- भाडेदर सुधारणा करण्यात आली. आता ऑटोरिक्षा (सीएनजी) साठी किमान देय प्रति १.५ किमी भाडे रू. २३/- वरून रू. २६/- भाडेदर असणार आहे.

हे भाडेदर सुधारणा मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील सर्व काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) यांना लागू राहील.

वरील भाडेदर सुधारणा दि.१ फेब्रुवारी २०२५ पासून लागू होईल. जे टॅक्सी व ऑटोरिक्षा परवानाधारक सुधारीत भाडेदरानुसार भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन करून घेतील त्या ऑटोरिक्षा / टॅक्सींना ही भाडेवाढ लागू होईल.

भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन दि.१ फेब्रुवारी २०२५ पासून दि.३० एप्रिल २०२५ पर्यंत करून घेणे आवश्यक राहील. भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन होईपर्यंत सुधारीत अधिकृत टॅरिफकार्ड दि.३० एप्रिल २०२५ पर्यंतच अनुज्ञेय राहील. विहित मुदतीत भाडे मिटरचे रिकॅलीब्रेशन न केल्यास संबंधित काळी-पिवळी मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा चालक / मालकास प्राधिकाऱ्याच्या दि.२० डिसेंबर २०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र.२२/२०२१ नुसार मुदत समाप्ती नंतरच्या प्रत्येक दिवसाच्या विलंबसाठी विभागीय दंडात्मक शुल्क आकारण्याचा निर्णय दि.१ मे २०२५ पासून लागू होईल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे रोहित काटकर यांनी कळविले आहे.

# लासलगाव महाविद्यालयात रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, लासलगाव (नाशिक) :** येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. त्यानुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे, सुजय बारगळ, उषा आहिरे, वैशाली अल्हाट, प्रा.किशोर गोसावी, डॉ.प्रदिप सोनवणे, डॉ.संजय शिंदे, डॉ.उज्वला शेळके, प्रा.देवेंद्र भांडे उपस्थित होते. सुजय बारगळ यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जर आज आपल्या देशामध्ये सगळ्यात जास्त मृत्यूचे प्रमाण असेल तर ते फक्त वाहन अपघातामुळेच आहे. याचे कारण म्हणजे वेगावर नियंत्रण नसणे, वाहन चालवण्याचा परवाना नसणे, हेल्मेट न वापरणे किंवा सीट बेल्टचा वापर न करणे हे आहे, यासाठी वाहनाचा वेग मर्यादित ठेवणे आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक नियम पाळण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. आपण आपल्या जीवनात आपल्याकडील असणाऱ्या गोष्टींना ज्या प्रमाणात जपतो जसे की आपला मोबाईल त्याला आपण स्क्रीन गार्ड वापरतो पण स्वतः वाहन चालवताना हेल्मेट वापरत नाही जर अपघातावर नियंत्रण आणायचे असेल तर आपल्याला वाहन चालवताना शिस्त पाळणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी यावेळी मुलींनी सोशल मीडियाच्या आहारी न जाता सोशल मीडियाचा कमीत कमी वापर करावा असे सांगितले. वैशाली अल्हाट यांनी देखील उपस्थित स्वयंसेवकांना रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून त्यांनी मार्गदर्शन केले.

स.पो.नि. भास्करराव शिंदे यांनी सांगितले की, चालकांना कितीही ताण तणाव असेल तरी मद्यप्राशन व नियमांचा भंग करुन वाहन चालवू नये असे सांगून




ते म्हणाले, वाहन चालविताना भ्रमणध्वनीचा वापर करु नये, भ्रमणध्वनीचा वापर केल्यास लायसन्सचे तीन महिने निलंबन करण्यात येते. वाहनाची दुरुस्ती व देखभाल चांगली ठेवणे, वाहन चालविताना प्रवाशांची व त्यांच्या कुंटुबाची काळजी घेवून वाहन चालवावे, तसेच देशातील अपघाताचे प्रमाण कमी करावयाचे असेल तर सर्वांनी नियमांचा अभ्यास करुन वाहने चाललावी असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांनी सांगितले की, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली आहे. अपघात हे न कळत, अनावधानाने होत असतात तर गाडी चालवत असताना फोन वर न बोलणे, ट्रॅफिक सिग्नल पाळणे, दुचाकी चालवताना सर्वांनी हेल्मेट चा वापर करावा. तसेच सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे ही आवश्यक आहे. व प्रत्येकामध्ये जागरूकता असणे ही गरजेचे आहे, शिक्षणासोबत आपल्या सुरक्षेची काळजी घेणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुनिल गायकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. संजय शिंदे यांनी मानले. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील रा.से.यो.चे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

# वेटलिफ्टिंगमध्ये महाराष्ट्राचा पदकांचा षटकार; ४ रौप्य, २ कांस्य

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, उत्तराखंड :** उराखंडातील ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ग्रामिण भागातील ध्येयवादी खेळाडूंनी वेटलिफ्टिंगमध्ये महाराष्ट्रासाठी ६ पदकांची लयलुट केली. सांगलीचा राष्ट्रकुल पदक विजेता संकेत सरगर,सांगली ची दिपाली गुरसाळे, पुण्याच्या सारिका शिनगारे व नाशिकच्या मुकुंद आहेरने रूपेरी यशाचे वजन पेलले. लातूरच्या आकाश गौड व पुण्याचा शुभम तोडकर यांनी कांस्य पदकाची कमाई केली.

१५ दिवसांपूर्वी गुडघ्याला व स्नायूला मोठ्या प्रमाणात दुखापती होऊनही सांगली जिल्ह्याची खेळाडू दिपाली गुरसाळे हिने या दुखापतीवर मानसिक तंदुरुस्ती भक्कम ठेवीत मात करीत वेटलिफ्टिंग मध्ये रौप्य पदक पटकाविले. दीपाली हिने ४५ किलो गटातील स्नॅचमध्ये ६९ किलो तर क्लीन व जर्क मध्ये ८२ किलो असे एकूण १५१ किलो वचन उचलले. केरळच्या सुफना जस्मिन हिने अनुक्रमे ७२ व ८७ असे एकूण १५९ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकाविले.

पुरुषांच्या ६१ किलो गटात महाराष्ट्राच्या सांगलीचा राष्टकुल पदक विजेता संकेत सरगर याने स्नॅच मध्ये ११७ किलो तर क्लीन व जर्कमध्ये १४२ किलो असे एकूण २५९ किलो वजन उचलले आणि रौप्य पदक जिंकले.



त्याचाच सहकारी पुण्याचा शुभम तोडकर याने कांस्यपदक पटकाविले. त्याने स्नॅच मध्ये ११४ किलो तर क्लीन व जर्कमध्ये १४० किलो असे एकूण २५४ किलो वजन उचलले. राष्टकुल स्पर्धेत हुकलेले सुवर्णपदक आता जिंकयचे असल्याचे संकेत सरगर यांनी सांगितले.

पुरुष गटातील ५५ किलो गटात महाराष्ट्राच्या मुकुंद आहेर व आकाश गौड यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्य पदकाची कमाई केली. मुकुंद आहेर याने स्नॅच मध्ये ११२ किलो वजन तर क्लीन व जर्कमध्ये १३५ असे एकूण २४७ किलो वजन उचलले. आकाश गौड याने मध्ये १०७ किलो वजन तर क्लीन व जर्कमध्ये १३७ असे एकूण २४४ किलो वजन उचलले.

पुण्याजवळील राजगुरूनगरमधील सारिका शिनगारे हिने महिलांच्या ४९ किलो गटात रुपेरी यश संपादन केले तिने स्नॅचमध्ये ७९ किलो तर क्लीन व जर्कमध्ये १०० असे एकूण १७९ किलो वजन उचलले. छत्तीसगडच्या ज्ञानेश्वरी यादव हिने अनुक्रमे ८५ व १०६ असे एकूण १९१ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले. २६ वर्षीय सारिका रेल्वेची खेळाडू असून पुण्यातील वडगाव मावळ येथे अनिकेत निवघणे यांच्याकडून प्रशिक्षण घेते. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील तिचे हे पहिलेच पदक आहे.

महिलांच्या ४५ किलो गटातील दीपाली हिने गतवर्षी झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत स्नॅचमध्ये ७५ किलो व एकूणाचा १६४ किलो वजन उचलून राष्ट्रीय विक्रम नोंदविला होता .यंदाही तिला राष्ट्रीय विक्रमाची अपेक्षा होती. मात्र १५ दिवसांपूर्वी सराव करताना तिच्या गुडघ्यावर आणि स्नायूंची मोठी दुखापत झाली. त्यामुळे आपली राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची संधी मुकणार की काय अशी शंका तिला निर्माण झाली मात्र तिचे प्रशिक्षक संतोष सिंहासने यांनी तिला मानसिक आधार दिला त्यामुळे तिने पंधरा दिवस जमेल तसा सराव करीत येथील स्पर्धेत भाग घेतला आणि महाराष्ट्राला आणखी एक रौप्यपदकाची कमाई करून दिली.

मुकुंद हा २१ वर्षीय खेळाडू रेल्वेमध्ये नोकरी करीत असून गोव्यामध्ये आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत त्याने सुवर्णपदक जिंकले होते. तो मनमाड येथे ज्येष्ठ प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. त्याच्या मेघा व वीणाताई या दोन बहिणींही राष्ट्रीय सुवर्णपदक विजेत्या खेळाडू आहेत.

मुकुंदचे यश पहाण्यासाठी त्याचे आजोबा एकनाथ , आजी गंगुबाई, आई इंदुबाई व वडिल संतोष आहेर डेहराडून आले होते. लाडक्या लेकाचे पदक पाहून साऱ्याचे कुटुंबियाचे डोळे आनंदाने पाणावले होते. आता मला राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत देशासाठी पदक जिंकायचे आहे असे मुकुंद यांने सांगितले.

# थोडक्यात

## ई श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत कामगारांना शिधापत्रिका देण्याची मोहीम

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.३०, डोंबिवली (ठाणे) :** ई श्रम पोर्टल वर नोंदणीकृत असलेल्या कामगारांना शिधापत्रिका देण्याचे शासनाचे आदेश आहेत. त्या अनुषंगाने पोर्टल वर नोंदणीकृत असलेल्या व शिधापत्रिका नसलेल्या डोंबिवलीस्थित कामगारांनी शिधावाटप कार्यालय ३९ फ उप, डोंबिवली पुर्व या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन शिधावाटप अधिकारी दिपक डोळस यांनी केले आहे.डोंबिवली पुर्व विभागात परिमंडळ कार्यालयाकडुन ५४८४ कामगारांची यादी प्राप्त असुन शिधापत्रिका नसलेल्या ४६७ कामगारांशी, भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्यात आला.ज्यांचेशी भ्रमणध्वनीवरून संपर्क होऊ शकला नाही. त्यांनी पोस्टाने पत्र पाठवलेत. त्यापैकी केवळ २४ कामगारांनीच कार्यालयाशी संपर्क साधून शिधापत्रिकेचा लाभ घेतला आहे. तरी जे कामगार पोर्टल वर नोंदणीकृत आहेत,भ्रमणध्वनीवरून वा पोष्टाने संपर्क साधण्यात आला आहे,अशा कामगारांनी शिधावाटप कार्यालय ३९ फ, डोंबिवली (उप) श्री छत्रपती शिवाजीमहाराज मंडई, नेहरू रोड, डोंबिवली पुर्व. या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधुन कागदपत्राची पुर्तता करावी, असे आवाहन श्री डोळस, शिधावाटप अधिकारी, डोंबिवली पूर्व यांनी असंघटित कामगारांना यांनी केले आहे.

## नॅक टीम सोबत माजी विद्यार्थ्यांचा संवाद



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२९, खंडाळा (सातारा) :** रयत शिक्षण संस्थेचे, शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद ता.खंडाळा जि.सातारा या महाविद्यालयाच्या चौथ्या नॅक मूल्यांकनासाठी राष्ट्रीय मूल्यांकन वअधिस्वीकृती समिती नॅक, बेंगलोर यांच्याकडून आलेल्या मूल्यमापन समिती कडून महाविद्यालयाचे मूल्यमापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यातील महत्वपूर्ण भाग असलेला माजी विद्यार्थी संवाद मेळावा बुधवार, दि.२९ जानेवारी २०२५ रोजी पार पडला. नॅक टीम चेअरमन प्रोफेसर मोहनचंद्रन नायर (केरळ), सदस्य समन्वयक प्रो.शैलेंद्र सिंह भडौरिया(मध्य प्रदेश), सदस्य डॉ.टिकम चंद लोया (राजस्थान) या तज्ञ मान्यवरांसोबत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी संवाद साधला. प्रारंभी माजी विद्यार्थ्यांकडून टीमचे स्वागत करण्यात आले. माजी विद्यार्थी युवा नेते सुनिल यादव यांनीशरदचंद्र पवार महाविद्यालय माजी विद्यार्थी म्हणून मला अभिमान आहे. यासोबत अनेक चढ उतारांचा सामना करत हे महाविद्यालय भक्कम पणे उभे आहे असे नमूद केले.माजी विद्यार्थी व महाविद्यालय विकास समिती सदस्य हणमंत शेळके पाटील म्हणाले-महाविद्यालयाने आजवर अनेक राजकीय, सामाजिक, शिक्षण, प्रशासन, सांस्कृतिक क्षेत्रात आपले विशेष स्थान प्राप्त केलेले विद्यार्थी घडवलेत याचे मोठे श्रेय शिक्षकांना जाते.

महाविद्यालय प्रगतीत माजी विद्यार्थी आपला वाटा उचलण्यात आजवर कमी पडला नाहीं आणि पडणारही नाही. माजी विद्यार्थी व विद्यमान नगपंचायत लोणंद नगरसेवक सागर शेळके पाटील म्हणाले-चांगला माणूस म्हणून नावलौकिक प्रक्रिया जडण-घडणीत गोळा असलेल्या विद्यार्थ्यांला घडविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणारे शिक्षक या महाविद्यालयात होते आणि आहेत. माजी विद्यार्थी व सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय राज्यशास्त्र विभागात कार्यरत प्रा.अमीर इनामदार म्हणाले-प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत उपेक्षितांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणारे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मयोगी भाऊराव अण्णांच्या विजोड शिक्षण कार्याला अविरत पणे पुढे नेणारे शरदचंद्र पवार महाविद्यालय आज माझ्यात जी सुप्त कौशल्य निर्माण झालीत त्यामध्ये मला प्रोत्साहन देणारे प्राचार्य, शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी वृंद यांचा वाटा आहे. विद्यमान विद्यार्थ्यांना कौशल्य, नीतिमूल्य संपन्न करण्यासाठी माजी विद्यार्थ्याचे कर्तव्य निभावेन अशी ग्वाही दिली. यासोबत प्रा.मनिषा चव्हाण, प्रा.अभिजित धुरगुडे, प्रा. शशिकांत शिंदे,स्वप्नील शेळके यांनी महाविद्यालय विषयी कृतज्ञता व्यक्त माजी विद्यार्थी-आजी विद्यार्थ्यांची सांगड घालून चांगला माणूस घडविण्यासाठी आम्ही खारीचा वाटा उचलू अशी ग्वाही दिली. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी(सेनि आयएएस) 'रयत' जनरल बॉडी सदस्य मिलिंद माने, प्राचार्य डॉ.सी.जी.खिलारे, प्रा.बी.टी.जाधव, प्रा.डॉ. छाया सकटे यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

## आदर्श शिक्षक शांताराम हरपाले यांचा ग्रामीण कौतुक सोहळा



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.३०, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील शेणसरी या ग्रामीण भागातून प्रतिकूल परिस्थितीतीलआदिवासी आश्रम शाळेत शिक्षण शांताराम हरपाले यांनी घेतले. विज्ञान शाखेत पदवी पूर्ण करून काही काळ आश्रम शाळेत अध्यापन त्यांनी केले. ग्रामीण भागातून खडतर प्रवास करत त्यांनी आश्रम शाळा व सध्या मुंबई येथे एका शाळेमध्ये अध्यापन करत असून विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये गोडी निर्माण करत शिक्षणाबरोबर कला, क्रीडा यामध्ये ही विद्यार्थ्यांना त्यांनी सर्वगुण संपन्न करण्यात मोठा वाटा आहे. शिक्षण क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केल्याबाबत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण या राष्ट्रीय पुरस्काराने संविधान दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती नवीन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे आदर्श शिक्षक शांताराम हरपाले यांना माजी केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी अल्पसंख्याक सदस्य रेंचलना यांच्या सन्मानित करण्यात आले.

या मानाच्या सन्मानामुळे हरपाले यांचे सर्वच स्तरावर कौतुक केले जात आहे. हरपाले यांनी डहाणू तालुक्यातील कै.छेदिसिंह ठाकुर आश्रम शाळा, साखरे येथे शिक्षण घेतले असल्याने नुकताच या शाळेचा दहावी वर्गाचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी हरपाले हे या शाळेचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांना या शाळेकडून ही सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्यध्यापिका संगिता चौधरी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक किरण पाटिल, किर्ती पाटील तर आदर्श शिक्षक शाळेचे माजी विद्यार्थी शांताराम हरपाले हे शाळेत कर्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे म्हणून सहपरिवार उपस्थित होते. यावेळी त्यांना शाळेकडून श्रीफळ, शाल पुष्पगुच्छ, आंब्याचे रोपटे देऊन सन्मान आला. यावेळी शाळेचे शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.